
गीतांजली

दीपावली मनाये सुहानी...





'दिवाळी सण मोठा नाही आनंदात तोटा' असं आपण म्हणतो. सणावारांचा उपयोग हिंदी चित्रपटात महत्त्वाचे प्रसंग किंवा गीतं यांसाठी नेहमीच केला जातो. पण इतर सणांच्या तुलनेत या दिवाळीच्या महत्त्वाच्या सणावर मात्र फारच थोडी दिवाळी गीतं आढळतात. अशा या स्मरणीय दिवाळी गीतांची आतिषबाजी...

□ अजित पोपट


बाहेर दिवाळीची रोषणाई, फटाक्यांचे आवाज. वडिलांशी लपाछपी खेळणारा मुलगा कपाटात लपतो. एवढ्यात चार गुंड घरात शिरतात. त्या माणसाने नुकतीच त्यांची साथ सोडलेली असते. शिक्षा म्हणून गुंड त्याला आणि त्याच्या पत्नीला ठार मारतात. कपाटात लपलेल्या मुलाकडे त्यांचं लक्ष जात नाही, पण मुलगा मात्र खुन्याच्या हातातील साखळीला जोडलेला घोडा लक्षात ठेवतो. मोठा झाल्यावर तो इन्स्पेक्टर बनतो आणि डॉनपर्यंत पोहोचतो. आणि त्याला ठार मारतो.

दिवाळीच्या रात्री फटाक्यांच्या आवाजात घडलेलं हे हत्याकांड *जंजीर* चित्रपटातलं होतं. अमिताभ बच्चनने त्यात मुख्य भूमिका केली. नायक म्हणून त्याचा पहिला सुपरहिट चित्रपट.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर असे बरेच प्रसंग आणि गीतं हिंदी चित्रपटांत आढळतात. दिवाळीवरील गीतं म्हटल्यावर चटकन आठवतं ते मुकेशच्या आवाजातलं हे गाणं 'एक वो भी दिवाली थी एक यह भी दिवाली है...' या गाण्याबद्दल बोलण्याआधी आपण दिवाळी हा सण अविस्मरणीय बनवणाऱ्या चित्रपटांबद्दल बोलू या.

हिंदी चित्रपटांतील पहिलं दिवाळीगीत कोणतं? या प्रश्नाचं उत्तर देताना चित्रपटसंगीत रसिकही क्षणभर विचारात पडतील. १९४०च्या दशकात दलसुख पंचोलींनी एक चित्रपट बनवला होता, खजांजी. त्याला गुलाम हैदरचं संगीत होतं. यात त्यांनी दिलेलं गीत असं होतं, 'दिवाली फिर आ गई सजनी...' *खजांची*चं हे गाणं इतकं हिट झालं की पंचोलींनी गुलाम हैदरला हवं ते माग असं दिलदारपणे सांगितलं होतं. तेव्हा सरळ स्वभावाच्या गुलाम हैदरनी राणी कंपनीची सायकल मागितली; याबद्दल खुद्द पंचोली आश्चर्यचकित झाले.

तर अशाप्रकारे *खजांची* चित्रपटातून दिवाळीगीतं सुरू झाली. पण शोधायला गेलो तर गेल्या पन्नास-साठ वर्षांच्या कालावधीत उणीपुरी पन्नास दिवाळी गीतंही सापडत नाहीत. इतक्या महत्त्वाच्या सणासाठी बोटावर मोजण्याइतकी दिवाळीगीतं आढळतात ही बाब खेदाची आहे. *जंजीर* चित्रपटात दिवाळीसारख्या सणाचा नकारात्मक उपयोग केला गेला. पण संगीत रूपात हिंदी चित्रपटांतून दिवाळी फार कमी चमकली. इतर हिंदू सणांवर आधारित बरीच गीतं आहेत.



लीडरमध्ये वैजयंतिमाला - दिलीपकुमार

म्हणूनच गीतांजलीत दिवाळीगीतं लिहिताना फार अडचण झाली. गेल्या पन्नास वर्षांत महंमद रफीने गायलेली पाच, आशा भोसलेची तीन, लताची दोन, मुकेशचं एक अशी फार तर दहा-बारा दिवाळीगीतं सापडतात. एका ज्येष्ठ संगीतकाराने तर असंही टोकलं, 'दिवाळीगीतांवर काय लिहायचं?'

तर, मुकेशच्या गीताने आपण विषय सुरू करू. १९६१मध्ये प्रदर्शित झालेल्या *नजराना* चित्रपटातील 'एक वो भी दिवाली थी एक ये भी दिवाली है...', 'उजडा हुआ गुलशन है खोया हुआ माली है...' राजेंद्र कृष्णने लिहिलेल्या या गीताला रवीने संगीतबद्ध केलं होतं. या गीताशी जोडलेली एक आठवण आहे. १९६३मध्ये राजकुमार-मीनाकुमारी आणि राजेंद्र (ज्युबिली) कुमारला घेऊन *दिल एक मंदिर*सारखा हिट चित्रपट बनवणाऱ्या श्रीधरनी *नजराना*चं दिग्दर्शन केलं होतं. राजेंद्रकुमारला ते या चित्रपटात हीरो म्हणून घेणार होते.

राजेंद्रकुमारचा नायक म्हणून पहिला हिट चित्रपट *वचन* (१९५५) होता. तेव्हापासून राजेंद्रकुमार आणि रवी चांगले मित्र होते. आणि राजेंद्रच्या सांगण्यावरूनच श्रीधरने संगीताची जबाबदारी रवीवर सोपवली होती. सुखाचे दिवस कायम राहात नाहीत. सुखाच्या दिवसांतली दिवाळी आतषबाजीसारखी असते. पण दुःखाचे दिवस अमावास्येची काळीकुट्ट रात्र घेऊन येतात. *नजराना*मधील नायक जिच्यावर प्रेम करत असतो तिच्याऐवजी तिच्या बहिणीशी लग्न करावं लागतं. त्या दुःखात भूतकाळातले सुखाचे दिवस आठवून तो हे गाणं म्हणतो.

राजेंद्र कृष्ण यांनी दिग्दर्शकाच्या सूचनेनुसार हे गीत लिहिलं. मुकेशने आपल्या दर्दभऱ्या आवाजात गायलं. पण राजेंद्रकुमारला काही ते आवडलं नव्हतं. कारण दिवाळी म्हणजे उत्साहाचा, आनंदाचा सण. नवे कपडे, फटाके, पंचपक्वान्न यांचा उत्सव. त्यात करुण गीताचं प्रयोजन काय? राजेंद्रने रवीबरोबर बराच काथ्याकूट केला. पण काही उपयोग झाला नाही. दरम्यान इतर काही कारणाने राजेंद्रकुमारने तो चित्रपट सोडला आणि राज कपूर नायक झाला. राज कपूरसाठी तर मुकेश दोस्तापेक्षाही अधिक होता. रसायन छान जमलं आणि चित्रपट सुपरहिट झाला. *नजराना*चं हे गीतही हिट ठरलं.

अलीकडेच दादासाहेब फाळके पुरस्कार मिळवणाऱ्या चिरतरुण गायिका आशा भोसले यांनी पहिलंवहिलं दिवाळीगीतही



स्वामी दादामधील उडत्या चालीच्या दिवाळीगीतावर नृत्य करताना रती अग्निहोत्री, मिथुन चक्रवर्ती आणि पद्मिनी कोल्हापूरे

योगायोगाने *खजांची* चित्रपटात गायलं. हा *खजांची* १९५८ साली प्रदर्शित झाला. गीतकार राजेंद्र कृष्णच होते. संगीत मदन मोहनचं होतं आणि इथेही नायक म्हणून राजेंद्रकुमारच होता. मदन मोहन यांनी दिग्दर्शक पी.एन.अरोरांना सांगितलं, 'लताकडून एखादं गीत गाऊन घ्या हं.' मदन मोहन-लताच्या जोडीने कितीतरी हिट गीतं दिली. पण पुन्हा नियतीच्या मनात काही वेगळंच होतं. *खजांची*ची सगळीच गाणी आशाकडे आली. त्यातलं एक गाणं होतं, 'आयी दिवाली आयी, कैसे उजाले लाई घर घर के खुशियों के दीप जले...' का कोण जाणे पण आशाच्या हिट गीतांत या गाण्याचा समावेश नाही.

आशाचं आणखी एक दिवाळीगीत नौशादचं आहे. दिलीपकुमार-वैजयंतिमाला आणि अमजद खानचे वडील जयंत अभिनित या चित्रपटात दिग्दर्शक राम मुखर्जीच्या लीडर (१९६४) चित्रपटात वैजयंतिमालाचं एक नृत्यगीत आहे. 'दिवाली आयी रे आयी...', 'दैया रे दैया लाज मोहे आयी...' आनंदाचं आणि उत्साहाचं गीत आहे. पण नौशादने त्यात भक्तिरसप्रधान गंभीर राग दरबारीचा कल्पकतेने वापर करून महंमद रफींकडून आलाप आणि अंतरे गाऊन घेतले.

आशाने आणखी एक छान दिवाळीगीत गायलं आहे. देव आनंदच्या *स्वामी दादा*तील हे गाणं आर. डी. बर्मनने स्वरबद्ध केलं होतं. 'पटाखा फुलझडी ना मैं हूं बाबू झोपडी का बम, ओ खुली सडकों पर पली...'

लीडर चित्रपटात आशाबरोबर अंतरा गाणाऱ्या महंमद रफीच्या वाट्याला फक्त दोन दिवाळीगीतं आली. त्यात एक गीत १९५५मध्ये प्रदर्शित झालेल्या *सब से बडा रुपैया*चं होतं. नंतर १९७६मध्ये कॉमेडियन मेहमूदने याच नावाने एक चित्रपट बनवला. पण आपण ज्या चित्रपटाबद्दल बोलतोय तो जुना चित्रपट. त्यात आगा, सुंदर, शशिकला वगैरे कलाकार होते. नौशादशी चांगली जोडी जमलेल्या पी.एल.संतोषीने याची गीतं लिहिली होती आणि इथे रफीबरोबर गायिका होती शमशाद बेगमच्या गायकीचा प्रभाव असलेली आशा भोसले. गाण्याचा मुखडा होता 'दिवाली ये कैसी, इस रात ये कैसा उजियारा छाया है...' या गीताचे संगीतकार कोण होते त्याबद्दल अजूनही प्रवाद आहेत. महंमद रफी गीतकोशात संगीतकार म्हणून नौशादचं नाव आहे.

सध्या युद्धजन्य परिस्थिती आहे. त्यामुळे देशभक्तीपर चित्रपटांची लाट आहे. चेतन आनंदचा पहिलावहिला युद्धावर आधारित चित्रपट होता *हकीकत*. १९६४मध्ये प्रदर्शित झालेल्या या कृष्णधवल चित्रपटात एक वेगळंच दिवाळीगीत होतं. आणि त्या गाण्यामागचा इतिहासही फार रोमांचक आहे. गीतं कैफी आझमींची आणि संगीत मदन मोहन यांचं होतं. चेतन आनंदने कैफी साहेबांना सांगितलं, 'आपल्यासारख्यांना बारा महिने येणारे सण सारखेच असतात. पण सीमेवर कडाक्याच्या थंडीत अंगावर गरम कपडे घालून सीमेचं रक्षण करणाऱ्या सैनिकांच्या मनात या सणांबद्दल काय भावना असतील त्या व्यक्त करणारं एखादं गीत लिहा.

*हकीकत*ची सगळीच गाणी हिट ठरली. (उदा. 'होके मजबूर मुझे उसने बुलाया होगा...' किंवा 'कर चले हम फिदा जानतन साथियों...', 'जरा सी आहट सी होती है तो दिल...') परंतु चेतन आनंदच्या मनातलं कैफींनी नेमकं ओळखलं आणि सुंदर गीत लिहिलं. 'आयी अब के साल दिवाली, मुंह पर आपने खून मले...' इतकी भावपूर्ण हृदयस्पर्शी कल्पना होती की नुसते शब्द वाचूनच एकेकाळी सैन्यात असलेल्या मदन मोहनचे डोळे पाणावले.

फार पूर्वी १९५५मध्ये *घर घर में दिवाली* नावाचा एक चित्रपट प्रदर्शित झाला होता. सोहराब मोदींच्या मिनर्व्हा मूव्हीटोन कंपनीने बनवलेल्या या चित्रपटात नंतर खलनायक-चरित्र अभिनेता बनलेला सज्जन नायक आणि श्यामा नायिका होती. प्रेम धवनच्या गीतांना रोशनचं संगीत होतं. त्यात लताने दिवाळीगीत गायलं होतं. बोल होते – 'दीप जले घर घर में, दिवाली आयी...' पण स्वतः लताला याबाबत विचारलं असता त्या मात्र *हकीकत*चं गीतच आठवतं असं म्हणतील.

आधी म्हटल्याप्रमाणे चित्रपटाला पूरक किंवा कथानक पुढे ढकलण्याच्या हेतूने चित्रपटांत दिवाळीचा वापर बरेचदा केला गेला आहे. पण गीत-संगीतात मात्र दिवाळीसारखा महत्त्वाचा सण उपेक्षित राहिला. म्हणूनच शोधून शोधून ज्या गीतांविषयी माहिती मिळाली ती इथे दिली. आणखी उल्लेख करण्याची दिवाळीगीतं म्हणजे *रंगोली* (१९६२) मधील 'रंगोली सजाओ रंगोली सजाओ...' या किशोरकुमारने गायलेल्या गीतांचा उल्लेख करता येईल. पण तसं ओढूनताणून लिहिण्यापेक्षा इथेच थांबावं. 'जी' वाचकांना दिवाळीचा हा गीतांचा फराळ कसा वाटला? ●